संस्थापना : ०३/०७/२००७ नोंदणी क्र. : ई/४९२६/पुणे/महाराष्ट्र

जगद्गुरू संत तुकाराम महाराज साक्षात्कार भूमी सेवा ट्रस्ट संचलित -

# संतभूमी संरक्षक संघर्ष समिती, महाराष्ट्र राज्य.

---

लढा भामचंद्राचा ! संतभूमी रक्षणार्थ ! तुकोबांच्या तपोभूमीचा !

**महाराष्ट्रातील जनता जनार्दनास विनम्र आवाहन !!**

महाराष्ट्राची संतपीठे जी पावन तीर्थक्षेत्रे ! भंग कराया सिद्ध जाहले प्रशासक आणि नेते !!.....मधुसूदन

मित्रहो,

जगद्गुरु संत तुकाराम महाराज हे महाराष्ट्राच्या महान संत परंपरेत कलशस्थानी असून त्यांची देहु जवळील तपोभूमी श्री श्रेत्र भंडारा – भामचंद्र आणि घोराडा डोंगर हे वारकरी संप्रदायाचे अध्यात्मिक स्फूर्तीस्थान आहे. महाराष्ट्रातील वारकऱ्यांची या डोंगरावर अनन्य श्रद्धा असून आजही लाखो वारकरी भाविक या पवित्र भूमीत येऊन इथे नतमस्तक होतात, तसेच तुकोबांचा समतेचा वसा-वारसा घेऊन अनेक साधक इथे नित्य ध्यानसाधना व अभंग गाथेचा अभ्यास करीत आहेत. हे जग प्रसिद्ध आहे.

याच भंडारा-भामचंद्र घोराडा डोंगरावर तुकोबांनी ज्ञानेश्वरी, भागवत, त्याचप्रमाणे कबीरादीक संत ग्रंथांचा अभ्यास केल्याचे दाखले शासनानेच प्रकाशित केलेल्या तुकोबांच्या चरित्रात सापडतात. जगाच्या कल्याणासाठी भक्ती आणि शक्तीचा मार्ग दाखवणाऱ्या अभंग गाथा स्फूर्तीचे हे स्थान आहे. त्या अभंग गाथेचा समावेश आज विश्वसाहित्य कोषात होऊन जगभरातल्या अनेक राष्ट्रात त्यांच्या अभंगावर अभ्यास होत असताना संतांची भूमी म्हणवून घेणाऱ्या आपल्या महाराष्ट्रात मात्र अभंग निर्मितीचे हे डोंगर एम्.आय्.डी.सी. - भूमाफिया - व्यावसायिकांच्या अतिक्रमणामुळे महाराष्ट्र शासनाकडुनच आज तोडले गेले आहेत, फोडले जात आहेत. हे महाराष्ट्र शासनाला लांच्छनास्पद आहे.

शासनाने एकीकडे महाराजांचे जन्म चतु:शताब्दी वर्ष मोठ्या प्रमाणात साजरे केले ति.क्षे.वि. आराखडाही घोषित केला. त्या अंतर्गत भंडारा डोंगरातील तुकोबांच्या नव मंदिर निर्माणाला कोणाचा विरोध असण्याचे काहीच कारण नाही परंतु दुसरीकडे याच कालखंडात त्यांची तपोभूमी असणारा भामचंद्र डोंगर राजकीय धनिक बिल्डरांद्वारे खाणी लावून खंडित करण्याचे पाप देखील केले. या तपोभूमी डोंगरांच्या रक्षणार्थ जगद्गुरू संत तुकाराम महाराज साक्षात्कार भूमी सेवा ट्रस्ट व श्री क्षेत्र भामचंद्र डोंगर केंद्रस्थानीय संत वाङ्मय सेवा संस्थेच्या माध्यमातून सनदशीर मार्गाने २००७ मध्ये भामचंद्र डोंगराला लागलेल्या खाणी प्राणांतीक उपोषणाद्वारे व सहकाऱ्यांच्या मदतीने थांबवून लगेच सन २००८ मध्ये "भामचंद्र डोंगर बचाव वारकरी शेतकरी संघर्ष समिती" च्या अध्यक्षतेखाली इथे 'डाऊ' रसायन कंपनी विरोधात मी वारकऱ्यांचे मोठे विद्रोही आंदोलन छेडले, त्यामुळे सरकारच्या येथील चुकीच्या औद्योगिक धोरणा विरोधात असंतोष निर्माण झाल्यानंतर सरकारला 'डाऊ' चा परवाना रद्द करावा लागला.

वारकऱ्यांच्या या विद्रोही आंदोलनाची दाहकता लक्षात आल्यानंतर येथील माझ्या ३६ वर्षाच्या एकांतिक गुफेतील वास्तव्यात पर्यावरण, ऐतिहासिकता, संतवाङ्मय संशोधनातील अभ्यासपूर्ण पाठपुराव्यानंतर महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक व पुरातत्व तशी अधिसूचना प्रसिध्द केली, परंतु एम्.आय्.डी.सी. व येथील पुढारी, खाजगी व्यावसायिक, जमिनदार भूमाफीयांनी या अधिसूचनेवर शेतीच्या व औद्योगिक विकासाच्या नावे खोट्या, संस्कृतिद्रोही हरकती घेतल्या आणि गंभीर बाब म्हणजे शासनाने या प्राचीन सांस्कृतिक तपोभूमी संतपीठाची जबाबदारी न घेता, त्या हरकतींची शहानिशा न करता उलट संरक्षित झालेले डोंगरातील क्षेत्र निम्याहून जास्त कमी केले आणि त्याला नाव दिले - सुधारीत प्रस्ताव ! वा रे वा !! शासन !!! म्हणूनच शासनाच्या या दृष्ट करणीमुळे आज उत्खनन, अवैध बांधकाम, खोदकाम सपाटीकरणामुळे संतश्रेष्ठ तुकोबांचे एकांत प्रिय तपोभूमी डोंगर आज उध्वस्त केले जात आहेत त्यांचे नैसर्गिक सौंदर्य, अखंडता व पावित्र्य आणि शांतता भंग केली जात आहे.

अशाप्रकारे जगद्गुरु संत तुकोबारायांच्या या तपोभूमी डोंगर संरक्षणाच्या बाबतीत शासनाची भूमिका स्पष्ट विरोधाभासाची असून शासनाच्या चुकीच्या धोरणा विरोधात सन २०१२ पासून मी महाराष्ट्रात पुन्हा फिरून ह.भ.प. दिंडीकरी, फडकरी, वारकरी संस्था, संत संथाने, ग्रामपंचायतीचे ठराव, व प्रस्तावाद्वारे शासन प्रशासन स्तरावर अनेक निवेदने तक्रारी देऊनही व सन २०१८ ला जिल्हाधिकारी कार्यालय पुणे येथे शासनचित्त शुद्धीसाठी सहा महिने सत्याग्रही आंदोलन करुनही शासनाने या बाबत कुठल्याही प्रकारची संवेदनशीलता आजपर्यंत दाखवलेली नाही. म्हणूनच, संत सज्जनहो या भ्रष्ट राज्यकर्त्यांच्या विरोधात आपण सर्वांनी पुन्हा एकत्र येऊन एकदिलाने वेळेवर आत्ताच आवाज उठविला नाही तर नजीकच्या काळात एम्.आय्.डी.सी. व व्यावसायिकांच्या कडून

हे तपोभूमी डोंगर पूर्णपणे खंडित बाधीत प्रदूषित होऊन विश्वसंत तुकोबांची ही ध्यान साधनाभूमी उध्वस्त झाल्या शिवाय राहणार नाही.

"वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे । पक्षीही सुस्वरे आळविती ।।" हा पर्यावरण रक्षणाचा, दिव्य जीवन जगण्याचा मूलमंत्र ज्या भंडारा-भामचंद्र घोराडा डोंगर या प्राचीन सांस्कृतिक निसर्गरम्य तपोभूमितून विश्वात प्रकाशित झाला तिचे संरक्षण, जतन, संवर्धन करण्याची सर्वस्व जबाबदारी आता प्रमुखत: ज्ञानोबा तुकोबांचा जयघोष करणाऱ्या आम्हा ह.भ.प. वारकऱ्यांवर येऊन ठेपली आहे.

महाराष्ट्राच्या भ्रष्ट शासनाला भानावर आणण्याचे काम आम्हाला पुन:श्च तीव्र विद्रोही आंदोलनाच्या मार्गाने करावे लागणार आहे. तुकोबांच्या तपोभुमीतील या विध्वंसाबाबत जाब विचारण्याचा अधिकार आम्हाला भारतीय संविधानाने दिला आहे. स्वार्थी भ्रष्ट राज्यकर्त्यांच्या वरदहस्तानेच श्री श्रेत्र भंडारा डोंगरावरील महाराजांचे प्राचीन मंदिर, सभागृह मंडप, धर्मशाळा बेकायदेशीरपणे भुईसपाट करुन भूतकाळातील प्रेरणादायी वैभव व इतिहास नष्ट केला आहे आणि आता बुद्ध, जैन, शैव लेणी संपन्न असा हा सांस्कृतिक ऐतिहासिक भामचंद्र डोंगराचा पायथा विकासाच्या नावे बेकायदेशीरपणे भूसंपादन करून एम्.आय्.डी.सी. कंपन्या व व्यावसायिक धनिक बिल्डरांकरवी तोडला गेला आहे.

रिलायन्स कंपनीची भली मोठी ज्वलनशील गॅस वाहिनी याच डोंगरातून नेली आहे. धोकादायक ज्वालाग्राही पेट्रोलचा साठा डोंगर अंतर्गत संरक्षित क्षेत्रात साठवला आहे. भामचंद्र डोंगराच्या पूर्व दिशेच्या कड्याला भली मोठी भेग पडली असल्याने हा डोंगरकडा केव्हाही कोसळण्याच्या अवस्थेत आहे आणि यामुळे होणारी जैव हानी अटळ आहे. हे सर्व शासनाचे रिपोर्ट आहेत. अशा विविध कारणांमुळे या तपोभूमी डोंगराच्या परंपरागत परिक्रमेला मोठा धोका निर्माण झाला आहे.

विश्वसंत तुकोबांच्या तपःसाधनेची अभंग साक्षीदार गुफा असलेली ही पावन साक्षात्कार तपोभूमी, जिथे छत्रपतींची व तुकोबांची ऐतिहासिक व मंगलमय भेट झाली असा श्री क्षेत्र भंडारा व भामचंद्र डोंगर वाचवनेसाठी मी या निवेदनाद्वारे महाराष्ट्रातील सर्व वारकऱ्यांसह संत साहित्यिक, पर्यावरण प्रेमी, इतिहास संस्कृती प्रेमी, ह.भ.प. संत सज्जन, भाविकांना आणि प्रामाणिक राज्यकर्त्यांना हे नम्र आवाहन करीत आहे. आपण सर्वांनी हे आज मनावर घेतले नाही तर.... ज्ञानोबा-तुकोबांचा पाईक व वारकरी म्हणून जगण्याचा नैतिक अधिकार तुम्हा आम्हाला नाही !

तुकोबारायांच्या अभंग वचनात सांगायचे झाले तर " पाईकीचे सुख जया नाही ठावे ! धिग त्याने ज्यावे वांयांविण !! ... या भूमीसाठी शिपाई होण्याचे सुख ज्यांना अनुभवता येत नाही त्यांच्या व्यर्थ जगण्याचा धिक्कार असो ! म्हणून अजूनही वेळ गेलेली नाही. प्रत्येकाने आपापले कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडण्यासाठी हे नम्र निवेदन आणि आवाहन या पत्राद्वारे आम्ही जनता जनार्दनाच्या चरणी करीत आहोत .

संतभूमी ही आम्हीच ठेवू मुक्त आणि स्वतंत्र !
घोर संघर्ष करुनी तोडू शत्रूचे षड् यंत्र !!
संतभूमी रक्षणार्थ केले आम्ही आवाहन सत्य ! ध्येयी आमुच्या एकनिष्ठ जे धन्य तेचि अमर्त्य !! ......मधुसूदन

कळावे, आपला विश्वासू

ॐ मधुसूदन

तुकायाभक्त - मधुसूदन पाटील महाराज
संस्थापक अध्यक्ष – संतभूमी संरक्षक संघर्ष समिती
- महाराष्ट्र राज्य

* मार्गदर्शन व संपर्कासाठी
ई मेल – santbhumi01@gmail.com
वेबसाईट - www.santbhumi.com
संपर्क- ९४२०२२४३४१, ७०८३७०५१७८, ७७४४८४४०६६ .

* पत्र व्यवहारासाठी पत्ता -
कार्यालय - शुभम हाईट्स, बी विंग, फ्लॅट नं. १३, रुणवाल सोसायटी जवळ, वारजे, पुणे ४११०५२